पिंपरी चिंचवड महानगरपालिका
ग क्षेत्रीय कार्यालय, थेरगाव - ३३
गक्षेका/४/ कावि/४/२०१७
दिनांक : २७ /०९ /२०१७

प्रति,
मा. - - - - - - - - - - - - - - - - - - - -
सदस्य/ सदस्या, ग प्रभाग समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
थेरगाव, पुणे-४११०३३

विषय: पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ग प्रभाग समितीची सभा मंगळवार दि. ३/१०/२०१७ रोजी आयोजित केलेबाबत.

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.ग प्रभाग समितीची **(पहिला सोमवार दि.२ ऑक्टोबर २०१७ रोजी महात्मा गांधी जयंतीची सुट्टी असल्याने)** मासिक सभा मंगळवार दिनांक ३/१०/२०१७ रोजी दुपारी २.०० वाजता ग क्षेत्रीय कार्यालयातील ‘ ग्रामदैवत बापुजी बुवा सभागृह’ येथे आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे ही विनंती.

आपला विश्वासू

प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
ग प्रभाग समिती

प्रत – सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
ग प्रभाग समिती
**कार्यपत्रिका क्रमांक ३**

दिनांक: ३/१०/२०१७ वेळ: दुपारी २.०० वाजता

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका ग प्रभाग समितीची सभा मंगळवार दिनांक ३/१०/२०१७ रोजी दुपारी २.०० वाजता ग क्षेत्रीय कार्यालयातील सभागृह येथे आयोजित करणेत आली आहे. सदर सभेत खालीलप्रमाणे कामकाज होईल.

अ) दि. ०४/०९ /२०१७ चे मासिक सभेचा सभावृत्तांत ( कार्यक्रम पत्रिका क्र. २ ) कायम करणे.

विषय क्रमांक १) मा.उषा वाघेरे यांनी सादर केलेल्या पत्रानुसार पिंपरी येथील प्रभाग क्रमांक २१ मधील अयप्पा मंदिरा जवळील संडास ब्लॉक असुन वापरास योग्य नसुन सदर ठिकाणी बहुतांशी सिंधी समाज वास्तव्यास असुन त्यांचे स्वत:चे घरात शौचालय आहे, सदर संडास ब्लॉकचा वापर रहदारी वाले वापरत असल्यामुळे दुर्गंधी पसरुन रोगराई वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी सदर ठिकाणाच्या वास्तव्यास असणा-या नागरिकांच्या तक्रारी वरुन सदर संडास ब्लॉक पाडण्यास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक २) मा.उषा वाघेरे यांनी सादर केलेल्या पत्रानुसार प्रभाग क्र.२१ मधील पी.सी.एम.सी.कॉलनी जवळ असलेले मुतारी व संडास ब्लॉक हे वापरण्यास योग्य नाहीत, तसेच जवळ परिसरात इंडस्ट्रीज एरिया असल्यामुळे निवासी मोजकीच आहेत व त्यांचे स्वत:चे शौचालय असल्यामुळे त्यांना त्याचा वापर होत नसुन, सदर ठिकाणी धुम्रपान तसेच मद्यपी लोकांचा वापर जास्त होतो, त्यामुळे सदर ठिकाणी अस्वच्छता वाढली असुन नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने हानिकारक आहे, तरी सदर संडास ब्लॉक व मुतारी पाडण्याच्या ठरावास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक ३) मा.उषा वाघेरे यांनी सादर केलेल्या पत्रानुसार प्रभाग क्र.२१ मध्ये रहदारी तसेच मुख्य खालील दर्शविलेल्या चौकामध्ये CCTV कॅमेरा बसवुन मिळणेबाबत विचार करणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | पॉवर हाऊस चौक | १२ | पवनेश्वर मंदिर चौक |
| २ | साई चौक | १३ | जलतरण तलाव रस्ता |
| ३ | शगुन चौक | १४ | बालामल चाळ |
| ४ | डिलक्स चौक | १५ | माळी आळी, समाधान चौक |
| ५ | जयहिंद स्कुल चौक | १६ | भिमनगर |
| ६ | अशोक थिएटर चौक | १७ | प्रभागातील झोपडपट्टी एरिया |
| ७ | भैरवनाथ मंदिर चौक | १८ | गंगवा चौक |
| ८ | नाणेकर कॅम्प चौक | १९ | प्रभागातील सर्व |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | बालोधान |
| ९ | न्हावी आळी चौक | २० | शाळा (मनपा) |
| १० | सौंदर्य चौक | २१ | स्मशान भुमी चौक |
| ११ | पवनेश्वर मंदिर चौक | | |

प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
ग प्रभाग समिती

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
ग क्षेत्रीय कार्यालय, थेरगाव -३३
गक्षेका /४/ कावि/ ४ /२०१७
दिनांक : २७ /०९ /२०१७